# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : १०/एनजीपी/हिवाळीसुट्टी/२०११/ ८७१

दिनांक : 19 अक्तूबर OCT 2011

**विषय : हिवाळी सुट्टी : शैक्षणिक वर्ष २०११-१२**

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणरी तंत्रनिकेतने व इतर पदविका (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षामध्ये ४० दिवस उन्हाळी सुट्टी व २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक परीक्षा व उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग थोपवून **दिनांक २५.१०.२०११ ते १३.११.२०११ पर्यंत २० दिवस हिवाळी सुट्टी** देण्यात यावी.

तसेच परिक्षा उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल, ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणतयाही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधीत कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हेही संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच त्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांमध्ये सत्र अभ्यासक्रम राबविले जातात. तेव्हा त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी, सदर सुट्टी २० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

आस्था-१

सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 12323
24 OCT 2011

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई.

---

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०११/ १५३८
दि. 29 OCT 2011

प्रति,
प्राचार्य,
**शा.अभि.महाविद्यालय,औरंगाबाद,शा.औषधनिर्माणशास्त्र महा.औरंगाबाद**
**शा.तंत्रनिकेतन,औरंगाबाद,जालना,अंबड,बीड,हिंगोली,उस्मानाबाद,नांदेड,पु.ला.लातुर,शा.नि.म.लातुर**

आपणास कळविण्यात येते की, मा.संचालकांच्या उपरोक्त पत्रान्वये **दि.२५/१०/२०११ ते १३/११/२०११ पर्यंत २० दिवस हिवाळी सुटट्री** देण्यात आलेली आहे. करीता आपल्या माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद